महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर–440 001
Email : msboardnagpur@gmail.com

महत्वाचे
कालमर्यादीत

पत्र कमांक : नाविमं/मा. प्रात्य./105
नागपूर, दिनांक:07/01/2025

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त शाळा,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय :** माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा ( इ.10 वी ) फेब्रु/मार्च 2025 च्या प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य वाटपाबाबत...

**संदर्भ :** राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा–2/4996, पुणे, दि. 23/12/2024.

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते कि, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत ) फेब्रु/मार्च 2025 मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक इ. 10 वी प्रात्यक्षिक परीक्षा **दि. 03/02/2025 ते 20/02/2025** या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

सदर परीक्षेसाठी आवश्यक असणारे साहित्य मंडळामार्फत **दि. 30/01/2025** रोजी सकाळी 11.00 ते 5.00 या वेळेत जिल्हा संकलन केंद्रावर वाटप करण्यात येईल. त्यासाठी सर्व मान्यताप्राप्त शाळांनी आपला प्रतिनिधी अधिकार पत्रासह पाठविण्याची व्यवस्था करावी.

**संकलन केंद्र.– साहित्य वाटप व साहित्य स्विकारणे खालील दिलेल्या संकलन केंद्रावर करण्यात येईल.**

1) लाल बहादूर शास्त्री कनिष्ठ महाविद्यालय, भंडारा
2) नंदलाल पाटील कापगते विद्यालय,साकोली,जि.भंडारा
3) हिंदी सिटी हायस्कूल, चंद्रपूर, जि.चंद्रपूर
4) जनता विद्यालय व क.महाविद्यालय,नागभिड,जि.चंद्रपूर.
5) न्यू. इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालय, वर्धा
6) शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, गोकुलनगर,गडचिरोली
7) धर्मराव विद्यालय,आलापल्ली,जि.गडचिरोली
8) हितकारिणी विद्यालय,आरमोरी,जि.गडचिरोली.
9) गुजराती नॅशनल कनिष्ठ महाविद्यालय, गोंदिया
10) नागपूर विभागीय मंडळ कार्यालय, नागपूर

प्रात्यक्षिक परीक्षा सुरळीतपणे पार पडतील या दृष्टीने आपण विशेष मार्गदर्शक सूचनांचे पालन करून मंडळास योग्य ते सहकार्य करावे. प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य आपल्या प्रतिनिधी मार्फत दिलेल्या वरील दिनांकास संकलन केंद्रावर प्राप्त करावयाचे आहेत. विलंबामुळे विद्यार्थ्यांचा निकाल राखीव राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मुख्याध्यापकांची राहील, याची नोंद घ्यावी.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रतिलिपीः–
1) सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक षिक्षण मंडळ, भांबुर्डा, पुणे यांचे माहितीस्तव समादराने.
2) विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांना माहिती करीता समादराने अग्रेषित.
3) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. भंडारा/चंद्रपूर/नागपूर/वर्धा/गडचिरोली/गोंदिया यांना माहिती करीता व उचित कार्यवाहीस्तव कळविण्यात येते की आपले अधिनस्त सर्व मान्यता प्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना आपल्या स्तरावरून लेखी कळविण्यात यावे.